## १०.महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | योजना अंमलबजावणी अधिकारीकर्मचारी/ | प्राचार्य |
| २ | कायदे शासन निर्णय/नियम/ | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा१०००/प्र.क्र.४८/का.१३, दि.११/९/२०००. |
| ३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | एकलव्य मॉडेल निवासी आश्रमशाळेसाठी केंद्र शासनाकडून सध्या रु.१०९०००/-प्रति विद्यार्थी/ प्रतिवर्षी अनुदान मिळते. सदर अनुदानातून शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तेथील विद्यार्थी व व्यवस्थापन यावरील खर्च भागविण्यात येतो. |
| ४ | पात्रता/निकष | १) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२) एकलव्य निवासी शाळांमध्ये CBSE च्या अभ्यासक्रमानुसार इयत्ता ६ वी ते १२ वीच्या वर्गात शिक्षण देण्यात येते. सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत शाळा, शासन मान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांतील इयत्ता ५ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेशपूर्व परिक्षा घेऊन इयत्ता ६ वी मधील प्रवेशांसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| ५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | संबंधित शासकीय / अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन मान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांचे प्राचार्य/ मुख्याध्यापक यांच्याकडे अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात येतो. |
| ६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | अर्ज संबंधित शासकीय, अनुदानित आश्रमशाळा/ जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन मान्य अन्य प्राथमिक माध्यमिक/ शाळांचे प्राचार्य, एकलव्य मॉडेल निवासी शाळा यांच्याकडे अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात येतो. |
| ७ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ८ | जोडावयाची कागदपत्रे | १. शाळा सोडल्याचा दाखला<br>२. इयत्ता ५ वी ची मार्कशीट छायांकित प्रत<br>३. पासपोर्ट साईज फोटो २<br>४. वैद्यकीय प्रमाणपत्र शासकीय रुग्णालय<br>५. उत्पन्नाचा दाखला वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा |

| | | |
|---|---|---|
| | | रु. ६.०० लक्ष आत राहील.<br>६. जातीचा दाखला पालकाचा /विद्यार्थ्याचा<br>७. रेशनकार्डाची छायांकित प्रत<br>८. रहिवासी दाखला<br>९. शंभर रुपये स्टॅम्प पेपरवर हमीपत्र<br>१०.आधार कार्डाची छायांकित प्रत वडिलांचे, विद्यार्थ्याचे, आईचे (२ प्रती) व आधार कार्ड<br>११.विद्यार्थ्याचे बँक पास बुकची छायांकित प्रत (२ प्रती) |
| ९ | प्रवेश देण्याचा कालावधी | प्रवेश परिक्षेचा निकाल लागल्यानंतर उपलब्ध जागेनुसार संबंधित एकलव्य निवासी शाळांच्या प्राचार्यामार्फत प्रवेश देण्यात येतो. |
| १० | प्रवेशासंबधी ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय. |